क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.९८ दिनांक 17/03/2007

विषय : निवडणुकीच्या कामासाठी कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहीत करण्याबाबत.

संदर्भ : शासनाचे अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००७/सं.क्र.१६८/ऊर्जा-२ दिनांक ०८.०२.२००७.

.....

शासनाचे अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्या संदर्भिय पत्रासोबत प्राप्त झालेल्या सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या क्र.ईपीक-१००७/४४२/३३ दिनांक ३१.०१.२००७ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर पत्रात महाराष्ट्र राज्यात मतदारांना छायाचित्र ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच हया कार्यक्रमासाठी शासनाकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा सदर कामासाठी अधिग्रहीत केल्या जातील अशा कर्मचा-यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याच्या सूचना प्रसृत करण्यात आल्या आहेत.

३. सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की निवडणुकीच्या कामासाठी राज्यातील मतदार ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करावयाचा असल्यामुळे संबंधित कर्मचा-यांना त्वरित कार्यमुक्त करण्यासंबंधीच्या वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु.य. पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
१) मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख/कक्ष प्रमुख
२) विभागीय व त्यावरील स्तराची सर्व क्षेत्रीय कार्यालये

*K/Adm.Circular – Election*
*02/03/07*

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : ईपीक-१००७/४४२/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि.३१ जानेवारी २००७

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**विषय : निवडणुकीच्या कामासाठी कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहीत करण्याबाबत**

भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मतदार छायाचित्र ओळखपत्राचा कार्यक्रम सुरु करण्यात येत आहे. हा कार्यक्रम विहित मर्यादेत पूर्ण करावयाचा असल्याने या कामासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहीत करणे अत्यावशक आहे. यास्तव जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकंडून या कार्यक्रमासाठी कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहीत केल्या असता काही विभागानी कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त न करण्याबाबत वेगवेगळया प्रकारच्या सबबी देण्यात आल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार छायाचित्र ओळखपत्राचा कार्यक्रम हा विहित मुदतीत पूर्ण करावयाचा असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ज्या कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहीत केल्या जातील अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन संबंधीतांना देण्यात याव्यात, ही विनंती.

(यु.पी.एस. मदान)
सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी,